INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL
ISSN NO : 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 13 | ISSUE - 4 | MAY - 2023

# साहित्य, समाज आणि संस्कृती

विजया बबन बनसोडे
एम ए मराठी.
महसूल सहायक, तहसील कार्यालय खटाव, जि. सातारा.

**गोषवारा**



जीवन हा साहित्याचा विषय आणि भाषा हे साहित्याचे माध्यम आहे. जीवन व भाषा या दोन्ही गोष्टी समाजाधिष्ठित आहेत. प्रत्येक समाजाजवळ एक संस्कृतीचा ठेवा असतो जो भाषेच्या माध्यमातून साहित्याद्वारे प्रकट होतो. शिवाय 'साहित्य' हे वाचक, श्रोते वा प्रेक्षक यांच्याकरीता निर्माण होते. 'साहित्यिक' हादेखील समाजाचाच एक घटक असतो. साहित्यनिर्मातीने साता समावान, संपत्ती व किती प्राप्त होते. या सर्वच गोष्टीत साहित्याचा समाजाशी असलेला संबंधची दिसून येतो. या मीमांसेतूनच आधुनिक मराठी साहित्याचे आरंभापासून ते अगदी आजच्या वर्तमान वास्तवापर्यंतचे सामाजिक, सांस्कृतिक व वाङ्मयीन स्वरूप आपल्या मनासमोर स्पष्टपणे उभे राहते. या अंगाने मराठी साहित्याच्या मर्यादा व वैशिष्ट्ये स्पष्ट होताना जाणवतात.

## प्रास्ताविक :

'साहित्य हे मानवी जीवनाचे प्रतिबिंब आहे "साहित्य हा समाजाचा आरसा आहे." "संस्कृती ही विविध लोकसमुदायाची सुजीवन पध्दती आहे" अशी विविध मते आपण ऐकतो. साहित्य, समाज आणि संस्कृती हे एकमेकांना परस्पर पूरक घटक आहेत. या साहित्य, समाज व संस्कृतीचा एकमेकांमध्ये JOURNEY सहसंबंध आढळतो. समाज व संस्कृतीचा तर या साहित्यावर प्रंचड प्रभाव आहे. या प्रभावाचा व्यापक विचार करावा लागतो. संस्कृती, समाज आणि साहित्य यांचे परस्परसंबंध स्पष्ट करतानाच काही महत्त्वाच्या पाश्चात्त्य आणि

**पौर्वात्य विचारप्रवाहांची अभ्यासपूर्ण चर्चा येथे केली आहे. प्रस्तुत ग्रंथात संस्कृती आणि साहित्य या संकल्पनांचे स्पष्टीकरण केले आहे, प्राचीन भारतीय संस्कृतीचे स्वरूप, सामर्थ्य आणि मर्यादा यांचा विचार केला आहे, तर पाश्चिमात्य आणि मार्क्सवादी विचारवंतांचे परिशीलन केले आहे. त्याप्रमाणेच चार मराठी कवी आणि चार मराठी कादंबऱ्यांतून सांस्कृतिक प्रभाव आणि परिवर्तनाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. ह्यापूर्वी ह्या अभ्यासविषयाची मराठी समीक्षेत ङ्गार कमी प्रमाणात चर्चा झाली आहे. अशा पार्श्वभूमीवर प्रस्तुत ग्रंथाचे महत्त्व अधोरेखित होते.** 'मराठी साहित्य, समाज आणि संस्कृती'हा डॉ. आनंद यादव यांचा तिसरा समीक्षा ग्रंथ. या ग्रंथात त्यांनी मराठी साहित्याचा मराठी समाजाशी आणि संस्कृतीशी कोणकोणत्या प्रकारचा संबंध असतो, त्या संबंधातून कोणकोणते वाङ्मयीन प्रश्न उपस्थित होतात, त्या प्रश्नांना कोणकोणत्या दृष्टीने सामोरे जावे लागते, याची मीमांसा मराठी साहित्यातील वस्तुस्थितीच्या आधारे केलेली आहे.

**मुलशब्द : नवनिर्मिती, साहित्यव्यवहार, अनुबंध, अंत स्वर, सामाजिक संवेदना, सांस्कृतिक पोषण, भग्नता, रूक्षता, अनोन्य, परिशिलन.**

## साहित्य, समाज आणि संस्कती :-

**कला, समाज आणि संस्कृती यांच्या अभ्यासाचे 'साहित्य' हे महत्त्वाचे माध्यम आहे तर साहित्य, समाज, आणि संस्कृती यांचे अत्यंत घनिष्ट संबंध असून ते परस्परांना पूरक असतात. "साहित्यनिर्मीती हा मानवाच्या सामाजिक जीवनातील सांस्कृतिक उपक्रम आहे, तसाच तो संस्कृतीचा एक घटकही आहे. विवाह संस्थेपासून राज्यसंस्थेपर्यंत सर्व सामाजिक संस्था, या संस्थाच्या लिखीत अलिखीत नियमातून निर्माण झालेल्या चालीरीती, रूढी परंपरा आणि रिवाज तसेच कला आणि साहित्य हे संस्कृतीचे चार घटक आहेत. या चार घटकांनी मिळून 'संस्कृती' हो लघुसंज्ञा परिचीत झालेली आहे. पुष्कळदा 'संस्कृती' आणि 'समाज' असे म्हणतो तेव्हा आपल्याला 'लोकांचे वर्तन' अभिप्रेत असते. समाज हा ओळखता येण्यासारखा 'लोकसमुदाय' असतो. तो आदिम समाज, भटका विमुक्त समाज, खेडयातील कृषिजीवनाशी निगडीत ग्रामीण समाज अथवा आधुनिक समाज असेल पण 'समाज' म्हणजे एकाअर्थी 'परिमित लोकांची संस्था'च असते. आणि संस्कृती म्हणजे विविक्षीत 'लोकसमुदायाच्या अथवा समाजाच्या जीवनाची विवक्षित पध्दती असते. या जीवनपध्दतीत कला आणि साहित्य यांना अविभाज्य आणि अपरिहार्य असे स्थान आहे." साहित्यकृतीची निर्मिती ही लेखकाची**

व्यक्तीनिष्ठ निर्मिती असली तरी त्याला त्याच्या समाज जीवनातून आणि सांस्कृतीक वातावरणातून साहित्याच्या निर्मितीच्या प्रेरणा व स्त्रोत मिळत असतात.

## साहित्य :

संस्कृत साहित्य मीमांसकांनी काव्याच्या/साहित्याच्या केलेल्या व्याखेवरून असे म्हणता येते की, 'साहित्य'. हा शब्द संस्कृत वाङ्मयात 'ललित वाङ्मय' या अर्थाने उपयोगात आणलेला आहे. वाङ्मय, सारस्वत ही साहित्याची पर्यायी संज्ञा आहेत. साहित्य म्हणजे असे लेखन की ज्यात शब्दार्थाना एक रमणीय अर्थ असतो. भाव, कल्पना, विचार, शैली इत्यांदीपासून हे रमणीयत्व, लालित्य आलेले असते. त्यामुळे हे लेखन लक्षणीय बनते. वाचकांना त्याच्या आस्वादातून एक प्रकाराचा आनंदप्रत्यय येत असतो. काव्य, कथा, कांदबरी, नाटक यांचा समावेश साहित्यातच असतो. साहित्य ही एका व्यक्तीमत्वाची नवनिर्मिती असते. लेखक कवी, आपली अनुभूती आपले अनुभवविश्व साहित्यातून व्यक्त करत असतो 'साहित्य' ही एक शक्ती आहे. मनासंबंधीच्या अनुभवातून एक मन तिची निर्मिती करते आणि अनेक मने तिचा आस्वाद घेतात. साहित्य शब्दांमधुन साकार होते. शब्द अनुभव प्रकट करतात. अनुभव अनेक मूल्यदर्शी भावघटकांनी संघटित होतो. यावरून लक्षात येते की, साहित्यकृतीमधील अनुभूती लेखकाने समाज परिसरातून घेतलेली असते. त्यामुळे लेखकाची 'अनुभवसृष्टी म्हणून जी संकल्पना मान्य केली जाते तिच्यावर समाज आणि संस्कृती यांचा प्रभाव दिसून येतो.

## समाज :-

एका समाज उद्दिष्टांसाठी एका विशिष्ट भूभागावर राहणाऱ्या व्यक्तींचा समुदाय म्हणजे 'समाज' होय. निव्वळ लोक एकत्रित आले म्हणजे समाज बनत नाही. समाज बनण्यासाठी त्या लोकांमध्ये संबंधाची व्यवस्था असली पाहिजे. समाज एका विशिष्ट भूभागावर वसलेला असतो, समाज स्थायी असतो, त्यात निरंतरता असते. समाजातील सदस्यांमध्ये आपलेपणाची भावना असते. समाजाची वैशिष्ट्यपूर्ण जीवनपध्दती असते. पुराणात समाजाचा उल्लेख 'समाज म्हणजे उत्सव' असा आढळतो. प्रत्येक समाजाची धारणा, त्यामागील रचनातत्त्वे वेगवेगळी असतात. धर्मसंकल्पना, रूढी, तत्त्वप्रणाली, आचार, विचार, दृष्टिकोन, संकेत, शिष्टाचार नीतीकल्पना इ. विशेष स्वतंत्र वा वेगळे असतात. त्या सर्वांवरच त्या-त्या समाजाची संस्कृती निश्चित होत असते. यावरून साहित्य हे जसे मानव्यसापेक्ष आहे तसाच मानव हा समाजसापेक्ष आहे आणि समाज हा संस्कृतीसापेक्ष आहे हे जर आपण मान्य करणार असू तर साहित्य आणि समाज यांच्यातील मूलभूत संबंध कोणालाच नाकारता येणार नाही.

## संस्कृती :-

केवळ मानव हाच 'संस्कृती' असणारा भूतलावरील एकमेव प्राणी आहे. संस्कृती ही मानवाने स्वतः निर्माण केलेली आहे. 'संस्कृती' हा शब्द 'कल्चर' या शब्दाच्या प्रतिशब्द म्हणून रूढ झाला आहे. 'संस्कार' आणि 'संस्कृती' हे दोन्ही सम + कृ या एकाच धातूपासून बनले आहे. त्यांचा अर्थही व्याकरणीकदृष्ट्या एकच आहे. पण संस्कार हा शब्द धार्मिक क्षेत्रापुरताच मर्यादीत राहिला. धर्मासह समग्र अंतर्बाहय जीवनाच्या उन्नत अवस्थ्सेसाठी 'संस्कृती' हा शब्द वापरला जातो. "मनुष्य समाजाची डोळयांना दिसणारी भौतिक वस्तुरूप निर्मिती व डोळयांना न दिसणारी पण विचारांना आकलन होणारी मनोमय सृष्टी म्हणजे संस्कृती होय" डॉ. इरावती कर्वे यांच्या संसकृतीच्या व्याख्येवरून 'संस्कृती' ची संकल्पना पूर्ण स्पष्ट होते.

## साहित्य म्हणजे काय ?

मराठी भाषेतील "साहित्य" ही संकल्पना इंग्रजीतील Literature या शब्दाला पर्यायी म्हणून उपयोजिली गेली. इंग्रजीतील Literature या शब्दाचा शब्दकोशात अर्थ "कलामूल्य असलेले लेखन, साहित्य विशिष्ट विषयावरचे वाङ्मय माहिती देणारे छापील वाङ्मय" असा आहे. तसे साहित्य हा शब्द "संहित" या धातूपासून निर्माण झालेला असून सहित चा अर्थ एकत्र ठेवलेले असा आहे. साहित्याचा व्यावहारिक अर्थ सामानसुमान असाही आहे. परंतु आपण साहित्याचे अभ्यासक म्हणून आपल्याला साहित्याचा जो अर्थ अभिप्रेत आहे. तो मौखिक, लिखित सर्जनशील साहित्य असा होय. परंतु मराठीत म्हणजे अशा सर्जनशील साहित्यांसाठी "वाय" "सारस्वत" "विदग्ध वाङ्मय", "ललित वाङ्मय" अशा पर्यायी संकल्पना उपयोजिल्या जातात. आजमितिस साहित्य आणि वाङ्मय या दोन संकल्पनाच प्रामुख्याने आपण वापरतो.

मराठीमध्ये साहित्याशिवाय मोठ्या प्रमाणात प्रचलित असलेली दुसरी संकल्पना म्हणजे दाङ्मय आता वाङ्मय याचा अर्थ वाक् (वाणी) मय अत्ता आहे. परंतु जो जो बागी युक्त आहे. ते सर्वच वाङ्मय असे म्हणता येत नाही. त्या प्रमाणेच जे जे लिहिले जाते त्या लिखित साहित्यालाही साहित्य म्हणता येणार नाही. या संरचनातील अतिव्याप्तीचा दोष टाळून आपण ज्या सर्जनशील साहित्याचा शोध घेतो ते ललित साहित्य होय. काटेकोरपणा निर्माण करण्यासाठी म्हणून साहित्याचा ललित व ललितेतर असा प्रकार भेद केला जातो. संस्कृत परंपरेमध्ये साहित्य असा शब्दप्रयोग इ.स. ९०० च्या सुमारास केला गेला साधारणपणे रुद्रटानंतर साहित्यशास्त्र हे काव्यमिमांसेचे मार्गदर्शक शास्त्र म्हणून रुढ झाले. तत्पूर्वी यास "अलंकार शाख" असे संबोधले जात असे व त्या शास्त्राच्या आचार्यांना आलंकारिक अशी पदवी

प्रदान केली गेली, प्राचीन काळात रस, गुण, रीती इत्यादीसाठी व्यापक अर्थाने अलंकार ही संकल्पना उपयोजिली गेली. न की शब्दा अर्थालंकार इ. मर्यादीत अर्थान, अलंकार या संकल्पनेशिवाय साहित्य या अर्थाने क्रियाकल्प अशीही संकल्पना वापरली गेली. क्रियाकल्प याचा अर्थ काव्य करण्याचे नियम अत्ता आहे. इ.स. १०० च्या दरम्यान काव्यमीमांसेचे शास्त्र या अर्थर्थाने साहित्य ही संकल्पना उपयोजिली गेली. आणि शब्द व अर्थ यांचे परस्परांना अनुरुप असे सौंदर्यशाहीत्व म्हणजे साहित्य असे स्थूलमानाने ठरले

## समाज म्हणजे काय?

साहित्याचे स्वरुप लक्षात घेतल्यानंतर समाज आणि संस्कृती ह्या संकल्पनेची चर्चा करणे ही अत्यावश्यक ठरते. समाजाकडे वस्तुनिष्ठपणे पाहण्याची दृष्टी १९ व्या शतकामध्ये प्राप्त झाली. त्यासाठी ऑगस्त कॉमा ह्या समाजशास्त्रज्ञाचा Positive Philosophy हा ग्रंथ आणि त्यामधील समाजशास्त्रीय वस्तुनिष्ठ दृष्टीचा आग्रह उल्लेखनीय ठरता, ऑगस्त कॉमाने मानवी बुद्धीचा विकास काल्पनिक, आध्यात्मिक व वैज्ञानिक या तीन अवस्थांमधून होतो असे म्हटले कारण मानवी बुद्धी आणि विकासाच्या वरील तीन अवस्था याचे नाते परस्परपूरक असते या त्याच्या मूलभूत प्रतिपादनामुळे समाजविषयक विचारांना चालना मिळाली. असे असले तरी प्राचीन काळात प्लेटोने ल्याच्या Republic आणि ॲरिस्टॉटलने त्याच्या Politics या ग्रंथामध्ये समाज विषयक मूलभूत चर्चा केलेली आढळते विशेष म्हणजे ॲरिस्टॉटलने मानवाची व्याख्या करताना मानव हा सामाजिक प्राणी आहे असे म्हटले होते.

एकोणिसाव्या शतकात समाजाच्या समाजशास्त्रीय अध्ययनाची एक मोठी परंपरा निर्माण झाली तसेच समाजविषयक वस्तुनिष्ठ अध्ययन करणारी समाजशास्त्र ही स्वतंत्र विद्या शाखाही अस्तित्वात आली. त्यामध्ये हर्बट स्पेन्सर, एमिल दरखाईम, मॅक्सवेपर, कार्लमाक्र्स एंगल्स या सर्वच समाजशास्त्रांचा महत्वाचा वाटा आहे.

## साहित्य समाज आणि संस्कृतीचा सहसंबंध :-

जीवन हा साहित्याचा विषय आणि भाषा हे साहित्याचे माध्यम आहे. जीवन व भाषा या दोन्ही गोष्टी समाजधिष्ठित आहेत, तर प्रत्येक समाजाजवळ एक संस्कृतीचा ठेवा असतो. शिवाय 'साहित्य' हे वाचक, श्रोते वा प्रेक्षक यांच्याकरीता निर्माण होते आणि 'साहित्यिक' हा समाजाचा एक घटक असून साहित्यनिर्मीतीने त्याला समाधान, संपत्ती व किर्ती प्राप्त होते, या सर्वच गोष्टीत साहित्याचा समाजाशी असलेला संबंधच दिसून येतो साहित्याचे समाजावर व समाजाचे साहित्यावर बरे-वाईट परिणाम होत असतात. त्याचे एक कारण असे देता येते की,

लेखक, वाचक, आणि भाषा हे साहित्यकृतीच्या संदर्भात लक्षात घ्यायला हवेत. हे तिन्ही घटक 'सामाजिक' म्हणून एकच कारण असे देता येते की, लेखक, वाचक, आणि भाषा हे साहित्यकृतींच्या संदर्भात लक्षात घ्यायला हवेत असे तिन्ही घटक 'सामाजिक' म्हणून अशा एक वस्तुचेच भाग असतात. त्यामुळेच साहित्याला एक सामाजिक परिणाम प्राप्त होत असते. त्यामुळेच तेथे कलात्मकतेबरोबरच सामाजिकतेचा विचारही महत्वाचा ठरतो.

"लेखक ही निर्मितीक्षम कलावंत असला तरी, तो नेहमीच एका विशिष्ट समाजाचा घटक असतो. व्यक्ती आणि समाज यांच्या संबंधाबाबतचे सर्व प्रश्न त्याच्याही बाबतीत उपस्थित होत असतात. त्याच्या कृती - उक्तीला नेहमीच एक सामाजिक परिणाम असते. व्यक्तीचे एकलेपण आणि सामाजिकता यातही एक गुढ संबंध असतो. त्यातील प्रश्नांची सोडवणूक साध्या, सरळ नियमांनी करता येत नाही हे खरे असले तरी त्या दोहोत असलेला संबंध अमान्य करता येत नाही".'साहित्य' आणि 'संस्कृती' यांचा निकटचा संबंध आहे. साहित्य हा संस्कृतीचाच एक भाग आहे. संस्कृती म्हणजे विशिष्ट काळातील समाजातील जगण्याची विशिष्ट रीती, पध्दती, धाटणी होय. संस्कृतीत सामावलेल्या कोणत्याही गोष्टीचे ज्ञान उपजत नसते. संस्कृतीचा वारसा पूर्वजांकडून मिळतो. परंतु प्रत्येक पिढी तेवढ्यावरच समाधान मानीत नाही. परिस्थितीशी समायोजन करताना व चिकित्सक बुध्दीने निर्माण केलेल्या प्रश्नांची उत्तरे शोधताना प्रत्येक पिढीला नवीन अनुभव येतो. नवनवीन संस्कृतीची निर्मिती होते. मूळ संस्कृतीत भर पडते. या प्रक्रियेमुळेच मानवी संस्कृतीचा सतत विस्तार होत आला आहे.

समाज विकसनशील आणि विस्तारशील आहे. संस्कृती हे या समाजाचे एक वैशिष्ट्य आहे. संस्कृतीसुध्दा विकसनशील आणि विस्तारशील असते. मानवी समाजाच्या सांस्कृतीक जीवनातील स्थिती गतीचा आलेख, निर्देश साहित्य कलांमधून प्रत्ययाला येऊ शकतो. मानवी समाजात संस्कृतीचे महत्व आहे. संस्कृती जोपासावी लागते. जोपासतानाच तिचे संवर्धन होते. साहित्य हे संस्कृतीची जोपासना करण्यांच, संस्कृतीचं रक्षण करण्याचं आणि संवर्धन करण्याचं कार्य करीत असते. समाज वास्तवाला साहित्यात अनन्यसाधारण महत्त्व असते. लेखक त्याने अनुभवलेले सामाजिक वास्तव आपल्या साहित्यकृतीतून मांडतो. त्यातून त्याच्या साहित्याला संदर्भ प्राप्त होत असतात. या संदर्भाच्या अभ्यासात साहित्य मार्गदर्शक ठरते. वरील संदर्भ लक्षात घेता लेखकाच्या सामाजिक जाणिवेचा, सामाजिक वास्तवाचा, समाज जीवनाचा, समाज परिवर्तनाचा, सामाजिक मूल्यांचा, समाजातील वृत्ती-प्रवृत्तींचा, समाज आणि साहित्य यांच्या सामाजिक बांधिलकीत लेखक हा व्यक्ती म्हणून समाजाचा घटक असतो. हा विचार लक्षात घेतलेला आहे. लेखकाच्या साहित्य निर्मितीत त्याचे सारे व्यक्तीमत्व सामावलेले असल्याने

साहित्याचा विचार करताना, त्याच्या व्यक्तीमत्वाचा विचार तितकाच महत्वाचा असतो. "सामाजिक आणि सांस्कृतीक पर्यावरण" हा सामाजिक घटक, वाड्मयनिर्मीती आणि अभिरूची, सामाजिक आणि सांस्कृतिक पर्यावरणातच घडत असते. लेखक आणि वाचक हे समाजाचेच घटक असतात. ते ज्या समाजाच्या पर्यावरणात वावरतात त्या पर्यावरणाचा त्यांच्यावर चांगला वाईट परिणाम होणे स्वाभाविक असते. शिवाय प्रत्येक समाजाची आपली म्हणून एक संस्कृती असते. या संस्कृतीची जडण घडण परंपरेने झालेली असते. समाजाच्या आचार-विचार, रूढी प्रथा यातून संस्कृतीला पैलू प्राप्त होत असतात लेखक आणि वाचक याच सामाजिक, सांस्कृतिक पर्यावरणात वाढलेला असतो. त्यामुळे या समाजाच्या जीवनपध्दतीचे चित्रण त्याच्या साहित्यकृतीतून येणे जसे स्वाभाविक असते तसेच ते वाचकालाही आपले वाटणे स्वाभाविक ठरते. काळ बदलला की सामाजिक आणि संस्कृतीत स्थिती बदलते. आणि बदलत्या स्थितीचा परीणाम साहित्यावरही झालेला दिसून येतो. स्वातंत्र्योत्तर काळानंतर दलित साहित्य, स्त्री साहित्य, इत्यादी साहित्य प्रकारात झालेला बदल हे काळाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक बदलाचे उदाहरण आहे.यावरून सामाजिक, सांस्कृतिक स्थिती बदलली म्हणजे साहित्यातूनही बदल घडून येतात. असे सिध्द होते.

## साहित्य आणि समाज

साहित्यनिर्मितीमधील आणि साहीत्यव्यवहारामधील समाज हा अत्यंत महत्त्वाचा आणि अचल असा घटक असतो. त्या त्या काळातील समाज जसा असतो, त्याप्रमाणे त्या काळातील साहित्य आणि साहित्यव्यवहार हा त्यानुरूप आकार धारण करत असतो. समाजाचा आणि सामाजिकतेचा विचार केल्याशिवाय साहित्यनिर्मितीचा आणि साहित्यव्यवहाराचा अर्थ कळतच नाही. साहित्यकृतीतून आविष्कृत झालेला अनुभव हा कुठल्या तरी समाजातीलच असतो समाजाशिवाय अनुभव नावाचा घटक अश्यकच असतो. लेखकाची जडणघडण ही समाजातच झालेली असते. त्याची मूल्यदृष्टीही त्याच समाजात आणि त्या समाजाच्या परिप्रेक्षात विकसित झालेली असते. प्रास्ताविक : समाज जीवनाचे, समाज मनाचे प्रतिबिंब साहित्यात उमटलेले असते. किंबहुना साहित्य हा त्यांचा आरसा असतो अर्थात त्यातून समाजाचा चेहरा दिसणे स्वाभाविक आहे. साहित्य प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे समाजावर काही संस्कार करीत असते, कधी ते ऐकीव स्वरूपाचे, मौखिक स्वरूपाचे असेल. अगदी मसणसाच्या बालवयापासून हे घडत असते. मग हे साहित्य धार्मिक, सामाजिक, राजकिय, वैचारीक स्वरूपाचे असू शकते. म्हणजेच साहित्य आणि समाज हे एक अद्वैत असेच आहे. साहित्यामुळे समाज घडतो. पण हे साहित्य

समाजाचेच देणे असते, हेही नाकारता येत नाही. कोणत्याही समाजाचा अनुबंध हा शेवटी समाजाशी असतो. कारण साहित्याचा मुलाधार.

## साहित्य, समाज आणि संस्कृती यांचा संबंध

साहित्य, समाज आणि संस्कृती या संकल्पना स्पष्ट केल्यानंतर साहित्याची निर्मिती स्थलकालबद्ध अशा सामाजिक, सांस्कृतिक आणि वाङ्मयीन अवकाशात होत असते. या अनुषंगाने साहित्याचा समाज / संस्कृतीशी संबंध येतो. त्या संबंधाची चर्चा करु या. साहित्यकृती ही घडलेली आणि घडवलेली असते असे तिच्या निर्मिती प्रक्रियेबद्दल दोन मते आढळतात. ती घडलेली असते असे म्हणताना तिची निसर्ग निर्मित वस्तुच्या नैसर्गिक घडणीशी तिचे नाते जोडले जाते. त्यामध्ये मानवाकडून ही गोष्ट घडते त्यासंबंधी तिचे अलौकिकवादी स्पष्टीकरण अभिप्रेत आहे. जसे की मज विश्वंभर बोलविती ही ज्ञानेश्वरांची प्रतिक्रिया किंवा करितो कवित्व म्हणाल कोणी। नव्हे माझी वाणी पदरीची। माझीया युक्तीचा नव्हे हा प्रकार ।। ही तुकारामांची प्रतिक्रिया साहित्य निर्मितीच्या प्रतिभा शक्तीचे अलौकिक स्पष्टीकरण देण्यावर भर देणारी आहे. जसे इंग्रजी मध्ये Poets are born not made असे म्हटले गेले. संस्कृत परंपरेतील बहुतांश प्रतिभा विषयक विचार हा भरतापासून ते जगन्नाथ पंडिता पर्यंत प्रतिभा साहित्य निर्मितीचा प्रमुख कारक घटक मानतानाच त्याचे अलौकिकत्व सिद्ध करणारा विचार आहे. साधारणपणे या विचारात प्रतिमा ही निर्मितीशी निगडीत मनाची शक्ती असून जन्मतःच प्राप्त झालेली देणगी असते. मनाच्या एकाच्या अवस्थेत ती क्रियाशील होते ती अलौकिक शक्ती आहे अशी तिच्या चर्चेची वैशिष्ट्ये आढळतात.

## साहित्य आणि संस्कृतीचं भान

भारतामध्ये खोलवर असा संस्कृती विचार विविध भाषांमध्ये मांडण्यात आला आहे. मराठी भाषेत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, आचार्य स. ज. भागवत दुर्गा भागवत, पु. ग. सहस्त्रबुद्धे आणि प्रा. इरावती कर्वे यांनी संस्कृतीच्या विविध अंगाची चर्चा केली. हिंदी भाषेमध्ये आचार्य हजारीप्रसाद द्विवेदी रामधारी सिंह 'दिनकर' जैनेंद्रकुमार, गजानन माधव मुक्तीबोध, राहुल सांस्कृत्यायन विष्णु प्रभाकर, डॉ. वासुदेवशरण अग्रवाल यांनी पण या विषयावर विपुल प्रमाणात लिखाण केले. हिंदीचा हा समृद्ध वैचारिक ठेवा भारतातील इतर भाषिकांना विशेषतः मराठी भाषिकांना प्राप्त व्हावा व त्याद्वारा राष्ट्रीय एकात्मतेचा आणि आंतरभारती'चा विचार दृढ व्हावा म्हणून हिंदीचे ख्यातनाम प्राध्यापक डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी हजारीप्रसाद द्विवेदी, दिनकर, मुक्तीबोध, जैनेंद्रकुमार, राहुल सांस्कृत्यायन विष्णु प्रभाकर

व डॉ. देवराज यांच्या संस्कृती चिंतनाचा आपल्या साहित्य आणि संस्कृती या पुस्तकात परिचय करून देऊन मोठेच काम केले आहे. कारण वर सांगितलेल्या थोर अभ्यासकांच्या समृद्ध विचारवंतांची मराठी भाषिकांना फारशी माहिती नव्हती. भारतीय सांकृतीचा अतूट आणि चिवट धागा भारतीय भाषांमध्ये विद्यमान असला तरी प्रत्येक भाषिक गटांची व त्यांच्या संस्कृतीची स्वतःची अशी काही वैशिष्ट्ये आहेत आणि हिंदीतील संस्कृती विचार वाचताना ती पृथगात्मता लक्षात येते. कारण त्यांच्या मांडणीत विशिष्ट प्रदेशाचे, भाषेचे आणि इतिहासाचे संदर्भ असतात.

इंग्रजीत Culture व Civilization हे शब्द संस्कृतीसाठी वापरले जातात. हिंदीमध्ये त्यासाठी संस्कृती आणि सभ्यता हे शब्द वापरले जातात. मराठीत मात्र दोन्ही शब्दासाठी संस्कृती हा एकच शब्द वापरला जातो. वेगवेगळ्या शब्दकोशात पाहिले तर असे दिसते की अनेक वेळा हे शब्द समानार्थी वापरले जातात. Culture मध्ये कला साहित्य, काव्य, चित्र व शिल्पकला व सामाजिक आणि राजकीय संस्थांच्या कार्याचा समावेश होतो. समन्वय, जैव घटकांतील अंतःसंबंध व वाढ यांचापण त्यात समावेश केला जातो. Civilization मध्ये माणसाचा एक प्रकारे विकास अपेक्षित आहे. हा विकास सुधारलेल्या अवस्थेकडून अधिक नागर समाजाकडे होणे अपेक्षित आहे. संस्कृतीत ही वाढ आतून व जैव प्रक्रियेतून होते तर सभ्यतेत ती बाहेरून प्राप्त प्रभावांच्या व संस्करणाच्याद्वारा होते. त्यामुळे या दोन्ही शब्दात एक प्रकारचा व्यक्तीचा आणि समाजाचा उच्चतर अशा ध्येयाकडे, अधिक नागर वा सुसंस्कृत समाजाकडे जाणारा विकास अपेक्षित आहे. मनुष्याने आपल्यात असणारे पशुत्वाचे अवशेष कमी करून अधिक मनुषत्व प्राप्त करावे हे अधिक चांगले. हिंसा, द्वेष व मत्सर यांचा त्याग करणारे विश्व निर्माण करावे हाच सांस्कृतिक विचाराचा व सभ्यतेचा आशय असतो. प्रस्तुत पुस्तकातील विविध लेख संस्कृतीचा हा आशय स्पष्ट करतात.

या पुस्तकातील पहिला लेख थोर तत्त्वज्ञ देवराज यांचा आहे व त्यात त्यांनी आज आपल्या मानवी संस्कृतीसमोर कोणते पेचप्रसंग उभे राहिले आहेत याची चर्चा करून एकोणीसाव्या व विसाव्या शतकात निर्माण झालेल्या विविध तत्त्व प्रवाहांची चर्चा केली आहे. आजच्या पेचप्रसंग नव्या विज्ञाननिष्ठ आणि भौतिक तत्त्वज्ञानातून निर्माण झाला आहे. ते उद्दिष्टसापेक्ष आणि प्रयोजनमूलक आहे. खरे पाहता तत्त्वज्ञानाचे स्वरूप मानवकेंद्रित व मानवाचे सृजनशील मानणारे असले पाहिजे, पण आज मानव्य विद्याशाखांना वैज्ञानिक पद्धतीत गुंतवण्याचा प्रयत्न केला जात आहे. पण या शाखा अनुभवजन्य व कल्पनामूलक असतात व त्यांची खात्री संख्यात्मक नसून गुणात्मक असते. डॉ. देवराज यांच्या मते मानव

सर्जनशील आहे व मानवी संस्कृती त्याचे एक रूप आहे. ते असे म्हणतात की, 'संस्कृती म्हणजे मानव जातीच्या सर्व ग्राह्य जीवन रूपांची निर्मिती आणि तिचा उपयोग करणे होय. ते असे मत व्यक्त करतात की, "एस.एन. वैद्य यांच्यासारखे विचारवंत हे भौतिकतावादी व मानवतावादी आहेत. त्यांना मोक्ष व अध्यात्म या कल्पना मान्य नाहीत. त्यांच्याद्वारे ऐहिक व नैतिक जीवन जगता येते. पण डॉ. देवराज यांना ते मान्य नाही. त्यांच्या मते मानवी व्यक्तिमत्वाचा विकास हा त्याच्या असंख्य संवेदनांचा व प्रेरणांचा विस्तार होय. या प्रगतीतून त्याचा विवेक जागृत होतो. ज्याच्या साहयाने ती व्यक्त सत्यासत्य, श्रेष्ठ व कनिष्ठ मूल्ये यांचा निवाडा करीत असते. मूल्यांच्या गुणात्मक प्रेरणांचे रूप आध्यात्मिक वृत्ती आहे. ज्यामधून परहिताकांक्षा, त्यागाची वृत्ती आणि सर्वभूतांप्रती समभाव निर्माण होतो. त्यांचे असे मत आहे की जोवर माणूस मूल्यांचा शोध घेत असतो व मूल्यांची निर्मिती करीत असतो तोवर तो सर्जनशीलच असतो. मानवी प्रगतीची दिशा ही उच्च अशा सांस्कृतिक मूल्य प्रेरणांचा विकास करण्याची राहिली आहे. डॉ. देवराज यांची अशा प्रकारे आदर्शवादी दृष्टिकोनातून संस्कृतीची तात्त्विक बाजू मांडली आहे.

## निष्कर्ष:-

माज, संस्कृती आणि वाङ्मय यांच्यातील संबंध अतूट असल्याने त्यांचा परस्परांवर प्रभाव पडत असतो. समाजात परिवर्तन घडू लागले की, वाङ्मयातही त्याचे पडसाद स्वाभाविकपणे उमटतात आणि त्यातही परिवर्तन घडून येते. याच दृष्टीने आपल्याला असे म्हणता येते की, सामाजिक, सांस्कृतिक चळवळी आणि वाङ्मय यांचा परपस्परावंर प्रभाव पडत असतो. मराठी साहित्य बाराव्या शतकापासून निर्माण झालेले असले आणि आपल्या साहित्याच्या या परंपरेचा आजच्या साहित्याशी व साहित्यविषयक वातावरणाशी संबंध असला तरी मराठी साहित्याच्या संदर्भात प्राचीन, अर्वाचीन हा भेद फार महत्वाचा आहे. या अर्वाचीन कालखंडात मराठी समाजाचा पाश्चात्य संस्कृतीशी जो संबंध आला त्या संबंधाचेच आपल्या आजच्या साहित्य संस्कृतीशी अधिक प्रभावी नाते असलेले आढळते. वरील सर्व विवेचनावरून असा निष्कर्ष निघतो की, 'साहित्य' हे समाज आणि संस्कृतीच्या प्रभावातून निर्माण होणारी एक कला आहे. साहित्याचा अनुबंध राष्ट्र, जात, धर्म, वंश, प्रदेश इत्यादी दृष्टीने तपासला असता त्यातून समाजाचे व संस्कृतीचे प्रतिबिंब अनुभवता येते. साहित्याची भाषा ही दलित, ग्रामीण, अभिजात, आदिवासी इ. दृष्टीने आधुनिक काळात बोलीरूप झालेली दिसते. त्यामुळे या सर्व साहित्यातून त्या-त्या बोलीच्या परंपरा, लोकतत्त्व आणि त्या-त्या समाज संस्कृतीचा आलेखच स्पष्ट होतो.

## संदर्भ सूची :-

1) **का-हाडे सदा - 'साहित्य आणि समाज'**

2) **कालकर्णी अर्गवंत वामन - साहित्य वितरण**

3) **साने गुरुजी,भारतीय संस्कृती,व्हीनस प्रकाशन,१९६९**

4) **महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतिक मंडळाचि स्थापना १९ नोव्हेंबर १९६०ला झाली.**

5) **मराठी भाषा, साहित्य, संस्कृती व कला या क्षेत्रांमध्ये महाराष्ट्रास लाभलेला थोर वारसा**